# बागेच्या आरेखनापूर्वी

- आर्कि. अभय स्मार्थ

आजच्या आधुनिक शहरातील वातावरण हे औद्योगिक प्रदूषणामुळे व वाढत्या लोकसंख्येमुळे अत्यंत तणावपूर्ण झाले आहे. औद्योगिकरण व विकासाच्या नावाखाली प्रचंड वृक्षतोड, काँक्रीट जंगलांमुळे संपूर्ण हिरवाई, वनराई अदृष्य झाली आहे यावर छोटासा उपाय म्हणून घरात व घराभोवताली, घरांवर बागा करणे, हिरवाई निर्माण करणे हा मार्ग आहे जे की आपल्याला सावली (अतिरिक्त उन्हापासून संरक्षण), नेत्रसुख व उत्पादन सुख देतात व वातावरणातील कर्ब (CO2) व इतर विषारी वायू शोषून घेतात व प्राणवायू आपल्यास देतात, उपलब्ध करतात.

घराभोवतालची बाग ही पूर्ण कुटुंबाकरिता सुंदर करमणुकीचे, हलक्या व्यायामाचे साधन होते. घरात, घराबाहेरचा एखादा जमिनीचा तुकडा, टेरेस, बाल्कनी ह्यात सजवलेली बागेत तुमचा दिवसाचा पूर्ण वेळ आनंदात जाऊ शकतो. घराभोवतालच्या लावलेल्या विविध प्रकारच्या वनस्पतींचे सौंदर्य व त्यांच्यापासून मिळणाऱ्या फळाफुलांची योग्यरित्या देखभाल करणे हे एक शास्त्र व तसेच कला देखील आहे. शहरातील बहुतांशी लोक हे छोट्याश्या फ्लॅटमध्ये राहत असल्याने त्यांच्याकरिता कुंडीतील बागेचा व व्हर्टिकल गार्डन हे उपाय चांगले आहेत. घराभोवतीच्या जागेमध्ये आंबा, पपई, चिकू, पेरू, अंजीर, नारळ, लिंबू इ. तर पालक, मेथी, कोथिंबीर, मुळा, गाजर, कोबी, भोपळा, शेंगा, अगदी सहजपणे वाढवता येतात तर जास्वंद, चाफा, मुसांडा, एक्सोरा. गुलाब, बेगोनिया अशी वर्षभर फुलणारी फुले देखील घेता येतात.

आपल्या घराभोवतालचा छोटा तुकडा, टेरेस किंवा बाल्कनी जिथे स्वच्छ ऊन व जवळच पाण्याची सोय असेल अश्या ठिकाणी किचन गार्डन करू शकतो.

जमीन उपलब्ध असल्यास - बाग करण्याकरिता अगोदर जमीन तयार करतांना ती जागा स्वच्छ करून लेव्हल करणे, नको असलेली जंगली तण, वनस्पती मुळासकट काढून टाकणे तसेच थोडेफार खोदून दगड गोटे असतील ते काढून घेणे आणि माती चांगली नसेल तर ती काढून नवीन गाळाची माती व सेंद्रिय खते मिसळून जमीन तयार करावी.

नंतर आपल्या आवडीनुसार, गरजेनुसार, बागेचा आराखडा तयार करावा ज्यामध्ये आपण हॉलमध्ये कुटुंबासमवेत, मित्रपरिवारासोबत गप्पा मारत बसतो तेथे काही शोभेच्या वस्तू असतात तसेच हॉलच्या समोरच्या गार्डनमध्ये गप्पा मारण्यास बसण्याची व्यवस्था, ग्रीन कारपेट, शोभेची फुलझाडे, एखादे कारंज अशी व्यवस्था असावी. किचन+वॉशरूम समोर कपडे धुणे वाळविण्याची जागा, किचन गार्डन इ. तर बेडरूम भोवताली शांत व रम्य वाटेल अशी छोटी हिरवळ, सुगंधी फुलांच्या वेली व मोनोक्रोमॅटिक (एकच रंगसंगती) प्लांटेशन स्कीम असावी.

## घरबागेत अजूनही काही जागा व प्रकार येतात.

**टेरेस गार्डन -** वॉटर प्रूफिंगची नीट काळजी घेतली तर टेरेस वर देखील आपण सर्व काही प्लँटेशन करू शकतो.

**बाल्कनी गार्डन -** फुलझाडांची उपयुक्तता आणि सौंदर्य यांचा अभ्यास करून काही ठराविक झाडे लावू शकतो.

खिडकीतील बगीचा - कुंडीचा व रोपांचा आकार उंची बघून आपण येथेही सुंदर बगीचा करूयात.

**किचन गार्डन -** आपल्या आवडीच्या फळ व पालेभाज्या येथे वाढवू शकतो हे करतांना बागेतील तण नेहेमी व्यवस्थित काढावेत, वेलभाज्यांना मांडवानी व काढ्यांनी योग्य आधार द्यावा. जुन्या व वाळलेल्या फांद्या वेळच्या वेळी काढाव्यात. सेंद्रिय खतांचाच वापर योग्य रीतीने करावा.

आता आपण बगीचा डिझाईन (आरेखन) करतांना काही मूलभूत गोष्टींचा व तत्वांचा विचार करूयात. जिथे बाग करायची आहे तिथे सूर्यप्रकाश कसा,केंव्हा व किती वेळ मिळतो याचा बारीक अभ्यास करावा.

त्यावरच आपण कोणती झाडे कोठे लावू शकतो हे ठरवू शकतो.

प्रथम जागा, त्यातील असलेल्या सर्व स्ट्रक्चर, पार्किंग स्पेस ह्यासकटसर्व गोष्टी कागदावर मांडाव्यात व नंतर आपल्या आवडीनुसार व गरजेप्रमाणे बागेचे आरेखन करावे. त्यामध्ये प्रवेशद्वार, आतमध्ये पार्किंग करत्यांना कमीत कमी हार्ड पेव्हमेंट कसे करावे लागेल, वाहनांची व वाहनांपासून कशी सुरक्षितता मिळेल, हार्ड सरफेसेसमुळे दृष्टीला व शरीराला कशी बाधा होणार नाही व सुंदर पॅटर्न्स कसे तयार करता येतील व सर्व ठिकाणी एकच लय निर्माण होईल आणि मुख्य म्हणजे टिकायलाही उत्तम असेल असा विचार व्हावा.



बागेचा लेआऊट करतांना एकत्र सरळ भौमितिक आकारांचा वापर किंवा नैसर्गिक आकारात लॉनची/ बैठकीची मांडणी केल्यास वापरायला व डोळ्यांना सुखद वाटेल असे बघावे. जागा असल्यास बागेमध्ये कुटुंबासह बसण्याची बैठक व्यवस्था, झोपाळा, शक्य असल्यास मुलांसाठी खेळणी ठेवावीत.

पावसाचे पाणी वाहून जाण्याची व्यवस्था, जल-मलनिस्सारणवाहिन्या, विद्युत वाहिनी बंगल्याभोवतीचे समासातील अंतर, इमारतींची प्रकाशयोजना, वायुविजन व्यवस्था व्यवस्थित असावी हा बगीचा म्हणजे घराचाचएक भाग आहे, दोन्ही एकमेकांमध्ये सामावले गेले पाहिजेत. बागेतल्या सर्व घटकांची व्यवस्था लॉन, फ्लॉवर बेड्स, पाथवेज, झाडांचे आकार, वॉटर बॉडीज, बसण्याची व्यवस्था एकतर भौमितिक आकारात करावी किंवा नैसर्गिक स्वरूपात करावी. परंतु त्यामध्ये लयबद्धता असलीच पाहिजे. ह्या दोन्हींची कल्पकतेने सांगड घालून बागेच्या जागेची उपयुक्तता व सौंदर्य खुलविण्यासाठी अनुभवी लँडस्केप आर्किटेक्टची गरज लागते.

जसे इमारतीमध्ये त्या इमारतीला आधार देण्यासाठी RCC कोलम, बीम यांची भूमिका असते, की ते एकदा बांधले गेले की बदलता येत नाही, तीच भूमिका बागेमध्ये मोठ्या झाडांची असते. ते संपूर्ण आवाराला त्या इमारतीला सावली, आधार देतात म्हणून त्यांची जागा सूर्यप्रकाशाचा व्यवस्थित अभ्यास करून करावी लागते. इमारतीला तीनच मिती (dimension) (लांबी,रुंदी,उंची) असतात. बागेतील सर्वात महत्वाचे एलिमेंट जे वनस्पती (झाडे,झुडपे,वेली,हिरवळ) ह्यांना ह्याबरोबरच वेळ, हवामान (ऋतू) हा चौथा मापदंड असतो. प्रत्येक दिवशी ऋतूप्रमाणे झाडे,फुल-फळझाडे त्यांचा रंग,रूप,गंध,आकार बदलत असतात त्याप्रमाणे आपल्याला विचार करून झाडांचे, फुलझाडांचे एकत्रितपणे रंगसंगतीचा, आकाराचा, पोताचा विचार केला पाहिजे.

पाण्याचा (कारंजे,धबधबा,तळ,ओहोळ) विचार करतांना ते वातावरण थंडावा निर्माण करतात व एक वेगळाच जिवंतपणा आणतात. कृत्रिम प्रकाश देतांना लो व्होल्टेज लाइटिंग फिक्शचर्स हे चांगले वातावरण निर्मितीकरिता व सेफ्टीकरिता वापरावेत. योग्य प्रोफेशनल प्लांनिंगला थोडी कल्पकतेची आणि क्रिएटिव्हिटीची जोड दिल्यावर कोणतीही रहिवासी किंवा औद्योगिक, व्यापारी जागेचा परिसर हा रम्य होऊ शकतो.

ज्या कोणालाही बगीचा तयार करायचा असेल त्याने दोन गोष्टी पक्क्या लक्षात घ्याव्यात १) भविष्यात ही झाडे झुडपे वाढल्यानंतर काय होईल, कसे दिसेल व २) बाग कायम सुंदर दिसावी व निगराणी करण्यास व वापरण्यास सोयीस्कर व्हावी ह्यासाठी कोणत्याही कलाकाराने त्याच्या सर्व सुंदर कल्पना एकाच ठिकाणी प्रदर्शित करण्याचा व इंच अन इंच शोभिवंत (तात्पुरता) करण्याचा घाट घालू नये. बागेची आखणी करतांना देखभालीसाठी वारंवारितेने येणारा खर्च, पाणी, मनुष्य बळाची उपलब्धता या पुढील संभावित बाबींचा विचार करावा व त्या प्रमाणातच बाग बनवावी.

**आर्की, अभय स्मार्थ**
उद्यान रचनाकार व सल्लागार
संपर्क - 9823060226